# ‘प्रोजेक्ट जल मूल्य’ची घोषणा

**पुणे, ता. २५ :** पाण्याच्या शाश्वत वापरासाठी त्याचे मूल्य समजणे गरजेचे आहे. यासाठी पुणे इंटरनॅशनल सेंटर (पीआयसी), सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट (गोखले इन्स्टिट्यूट) आणि पुणे नॉलेज क्लस्टर यांच्या सहकार्यातून ‘प्रोजेक्ट जल मूल्य’ सुरू करण्यात आला आहे.

सेनापती बापट रस्त्यावरील ‘एमसीसीआयए’ येथे आयोजित पत्रकार परिषदेत ‘पीआयसी’मधील सायन्स टेक्नॉलॉजी अँड नॅशनल इनोवेशन इकोसिस्टिम विभागाचे संशोधन प्रमुख दीनानाथ खोलकर, ‘पीआयसी’चे सदस्य सिद्धार्थ देसाई, पुणे नॉलेज क्लस्टरमधील सस्टेनेबिलिटी अँड एन्वायरन्मेंट विभागाच्या प्रकल्प व्यवस्थापक डॉ. आश्विनी केसकर सरदेशमुख आणि गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेचे डॉ. गुरुदास नूलकर यांनी ही माहिती दिली. एक वर्ष चालणाऱ्या या अभ्यासाचे मुख्य उद्दिष्ट पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील पाण्यासंदर्भातील सेवा व किमतीच्या संरचनांचे मूल्यांकन करून अहवाल तयार करणे हे आहे.

## कशाचा होणार अभ्यास ?

- पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील पाण्याचा वापर
- दोन्ही शहरांत पाणी पोहोचविण्यासाठी लागणारी किंमत
- पाण्याचा शाश्वत पुनर्वापर आणि मागणी-पुरवठ्याचे व्यवस्थापन
- पाण्याची सोसायटी स्तरावर होणारी गळती
- तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, ५जी तंत्रज्ञानाचा पाणी व्यवस्थापनातील वापर